# ‘परागीभवनासाठी मधमाश्यांचे महत्त्व’ झाले अधोरेखित

सार्वजनिक उपस्थितीवर बंधने असल्याच्या ‘कोरोना’ संक्रमणाच्या सद्यस्थितीत, शेतकरी तसेच मधमाशी पालकांच्या सतत संपर्कात राहण्यासाठी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’ संचलित ‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा’च्या वतीने दि. २४ जून २०२० रोजी सकाळी ११ ते १२.३० या दरम्यान ‘परागीभवनासाठी मधमाश्यांचे महत्त्व’ या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव तथा ‘पूर्वा कृषिदूत’ मासिकाचे संस्थापक संपादक व ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ **डॉ.श्री. बी.बी. पवार** आणि ‘पूर्वा कृषिदूत’चे संपादक **डॉ.श्री. भास्कर गायकवाड** या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.श्री. बी.बी. पवार यांनी ‘मधमाश्यांचे परागीभवनामधील महत्त्वाचे स्थान’ या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशनच्या माध्यमातून पिकाची परागीभवनाची प्रक्रिया आणि त्यामुळे फळधारणा, उत्पादनवाढ तसेच गुणवत्ता सुधार अशा महत्त्वपूर्ण तांत्रिक विषयांची शास्त्रीय पद्धतीने सखोल माहिती दिली. तसेच मधमाश्यांमुळे विविध पिकांच्या उत्पादनामध्ये होणारी वाढ याबद्दलही विवेचन केले.

डॉ. भास्कर गायकवाड यांनी मधमाशी पालन आणि परागीभवन या विषयांवर जागतिक, राष्ट्रीय तसेच राज्य (महाराष्ट्र) पातळीवर सुरू असलेल्या कार्याचा तपशील दिला. परागीभवनाद्वारे पिकाची उत्पादनवाढ करणे तसेच परागीभवन सेवा देऊन रोजगारनिर्मिती करणे या दोन महत्त्वाच्या विषयांची सविस्तर माहितीही पॉवर पॉईंटच्या माध्यमातून दिली.

या वेबिनारमध्ये २०० पेक्षा जास्त जिज्ञासूंनी सहभाग नोंदवला होता. वेबिनारनंतर अनेकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे तज्ज्ञांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचा परिचय ‘पूर्वा केमटेक’च्या मानव संसाधन विभागाचे **श्री. रुपेश ठाकरे** यांनी करून दिला. तसेच उत्तम सूत्रसंचालन करून सर्व सहभागींचे आभारही मानले.




**(सौजन्य : ‘पूर्वा कृषिदूत’ परिवार)**